**तातडीचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८. लेखा विभाग
क्र. लेखा/१अ/कावि/६०८/२०१७
दिनांक :- १५/०७/२०१७

**विषय :- महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांच्या जुलै २०१७ च्या वेतनातील १ दिवसांचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये देणगी म्हणून देण्याबाबत..**

**संदर्भ :- महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र विकाक २२१६/प्र.क्र.२५०/१६-अ. दि. २१/६/२०१७**

**परिपत्रक**

महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील संदर्भिय परिपत्रकान्वये राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या विधवांना आर्थिक सहाय्य देणे त्यांच्या मुलांना शिक्षणासाठी आर्थिक मदत करणे या कामास हातभार लागावा म्हणून शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचा सहभाग असावा या हेतूने त्यांच्या माहे जुलै २०१७ च्या वेतनातील १ दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देणेबाबत आवाहन करणेत आले आहे सदर विकल्प ऐच्छिक स्वरुपाचा आहे. संदर्भिय शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडले आहे.

सदर वेतन कपातीसाठी व ती रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये जमा करण्यासाठी व त्याचा हिशोब सादर करण्यासाठी सोबतच्या परिपत्रकानुसार खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

१) विभागाच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे जुलै २०१७ च्या वेतनातील १ दिवसाचे वेतन कपात करावे, सदर १ दिवसाचे वेतन कपात करतांना ते मूळ वेतन+ग्रेड पे+महागाई भत्ता यांच्या एकूण रक्कमेच्या आधारे गणना करुन कपात करण्यात यावे.

२) अधिकारी/कर्मचा-याकडून जुलै २०१७ चे वेतनातुन १ दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधी मध्ये देणेस इच्छूक असलेबाबत परिपत्रकाचे सोबतच्या नमुन्यात अनुमतीपत्र घ्यावे.

३) वेतन देयक संपूर्ण रक्कमेचे काढण्यात यावे. वेतनातील नियमीत वजाती व १ दिवसाच्या वेतनाच्या वजातीनंतर वेतनाची उर्वरित रक्कम अधिकारी/कर्मचा-याच्या बँक खात्यावर जमा करण्यात यावी

४) वसूल करण्यात आलेल्या रक्कमेची नोंद घेण्यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवून(वजाती तक्ता) त्यामध्ये वसूल केलेल्या रकमेची नोंद घेण्यात यावी.

५) शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून १ दिवसाचे वेतन कपात केल्यानंतर विभाग प्रमुखांनी अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून वसूल केलेल्या देणगीबाबतचे प्रमाणपत्र संबंधितास दयावे. (प्रमाणपत्राचा नमुना सोबत परिशिष्ट " अ " येथे जोडला आहे.) सदर देणगी आयकर कायद्यान्वये १००% सुट देण्यास पात्र असेल. वित्तीय वर्ष २०१७-१८ म्हणजे आकारणी वर्ष २०१८-१९ या वर्षासाठी आयकर सुटीचा फायदा शासन परिपत्रका सोबतचे परिशिष्ट " अ " नुसार १ दिवसाचे वेतन कापून घेण्यास परवानगी देणेत आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय राहील.

६) एक दिवसाच्या एकूण वेतना इतक्या रक्कमेपेक्षा कमी रक्कम कापून घेणेस परवानगी देण्यात येऊ नये.

७) लेखा विभागाकडील टेबल क्र. २३ ने शासनाचे दि. २१/०६/२०१७ चे परिपत्रकातील सुचनेनुसार जमा होणारी एकत्रित रक्कम नमुद बँक खात्यात जमा करावी व त्याबाबतच्या तपशीलाची माहिती विहीत नमुन्यामध्ये मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे पाठवावी.

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

सोबत - शासन परिपत्रक
दि २१ जुन २०१७

प्रती :- सर्व विभागप्रमुख व कार्यालयप्रमुख

प्रत:-

१. लेखा विभागाकडील टेबल क्र.२३ (वजाती टेबल)

२/-शासनाचे संदर्भिय दि.२१/०६/२०१७ चे परिपत्रकासोबतचे परिशिष्ट "क" नुसार कार्यवाही करावी.

२. माहिती व तंत्रज्ञान विभाग (**योग्य त्या कार्यवाहीसाठी**)

३. प्रशासन विभाग (**योग्य त्या कार्यवाहीसाठी**)

राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या कुटुंबातील विधवा पत्नी व मुलांना मदत म्हणून राज्यातील सर्व भा.प्र.से., भा.पो.से., भा.व.से व महाराष्ट्र राज्य शासनाचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी जुलै, २०१७ च्या वेतनातील एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: विकाक २२१६/प्र.क्र.२५०/१६-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २१ जून, २०१७.

प्रस्तावना -

राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी तसेच आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या कुटुंबातील विधवा पत्नी व त्यांच्या मुलांना शिक्षणासाठी आर्थिक मदत म्हणून निधी जमा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

परिपत्रक -

राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या विधवांना आर्थिक सहाय्य देणे, त्यांचे मुलांना शिक्षणाकरीता आर्थिक मदत करणे या कामास हातभार लागावा म्हणून राज्याचे मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, मा.राज्यमंत्री, मा.विधान सभा सदस्य, मा.विधान परिषद सदस्य, भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलिस सेवा, भारतीय वन सेवा यामधील अधिकारी व राज्य शासनाचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांचा सहभाग असावा या हेतूने त्यांना माहे जुलै, २०१७ च्या वेतनातील १ दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. सदर विकल्प हा ऐच्छिक स्वरुपाचा आहे.

३. राज्य शासनातील सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका/ नगरपरिषद, सार्वजनिक उपक्रमे, महामंडळे, मंडळे तसेच सर्व स्वायत्त संस्थेचे विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी सदर परिपत्रक आपल्या विभागातील/कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून दयावे. तसेच एक दिवसाच्या वेतन कपातीस त्यांची अनुमती यासोबतच्या विहित अनुमतीपत्रात स्वाक्षांकित करुन आपल्या विभागातील/कार्यालयातील रोख कार्यासन वा रोखपाल यांचेकडे सुपूर्द करण्यासाठी त्यांना सूचित करावे.

४. अधिकारी/कर्मचारी यांच्या पगारातून एक दिवसाचे वेतन (माहे जुलै, २०१७) कपातीसाठी व ती रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करण्यासाठी व त्याचा हिशोब सादर करण्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा:-

(एक) माहे जुलै, २०१७ या महिन्याची वेतन देयके संपूर्ण रकमेची काढण्यात यावीत. तथापि, वेतनातील नियमित वजातीनंतर व एक दिवसाच्या वेतनाच्या वजातीनंतर वेतनाची उर्वरीत रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना धनादेश/रोखीने/ विहित पध्दतीने अदा करण्यात यावी.

सध्या ज्या अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन त्यांनी शासनास उपलब्ध करुन दिलेल्या त्यांच्या बँक खात्याच्या तपशिलानुसार खात्यावर परस्पर जमा करण्यात येते अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनातील नियमित वजातीनंतर उर्वरित वेतनाची रक्कम संबंधित बँकेकडे जमा करण्यापूर्वी सदर रकमेतून जुलै, २०१७ मधील वेतनातून १ दिवसाचे वेतन कमी करुन शिल्लक रक्कम त्यांच्या खात्यावर जमा करण्याचे कळविण्यात यावे.

(दोन) सदर १ दिवसाचे वेतन कपात करताना ते मूळ वेतन+ग्रेड पे+महागाई भत्ता यांच्या एकूण रकमेच्या आधारे गणना करुन कपात करण्यात यावे.

(तीन) वेतन वितरणाच्या वेळी वरीलप्रमाणे वसुली करुन वसूल केलेल्या रकमेची नोंद घेण्यासाठी (माहे जुलै २०१७ करिता) एक स्वतंत्र नोंदवही ठेऊन त्यामध्ये वसूल केलेल्या रकमांची नोंद कर्मचारीनिहाय घेण्यात यावी.

(चार) अशाप्रकारे मुख्यमंत्री सहायता निधीसाठी एकत्रित होणारी रक्कम विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख तसेच जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी/ मुख्य अधिकारी, नगरपरिषद/ नगरपालिका, आयुक्त, महानगरपालिका यांनी मुख्यमंत्री सहायता निधी यांची वेबसाईट www.cmrf.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर भरणा करुन त्या ठिकाणी तयार होणा-या पोचपावतीची प्रत मुद्रीत करुन घ्यावी किंवा खाली नमूद केलेल्या तपशीलाप्रमाणे मुख्यमंत्री सहायता निधी बँक खात्यात परस्पर जमा करावी व त्याची पोचपावती, गोळा केलेल्या रकमेच्या देणगीदारांच्या यादीसह दोन प्रतीत परस्पर मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय, ६ वा माळा, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई- ४०००३२ यांच्याकडे निश्चित प्राप्त होईल अशा प्रकारे रकमेचा भरणा केल्याच्या दिनांकापासून ७ दिवसाच्या आत अचूक पाठवावी.

**<u>मुख्यमंत्री सहायता निधी बँक खात्याचा तपशील</u>**-

| | |
|---|---|
| **मुख्यमंत्री सहायता निधी,**<br>**बचत खाते क्रमांक १०९७२४३३७५१**<br>**स्टेट बँक ऑफ इंडिया,**<br>**मुंबई मेन ब्रँच, फोर्ट, मुंबई-४०० ००१.**<br>**ब्रँच कोड-००३००,**<br>IFS Code : SBIN००००३०० | **Chief Minister's Relief Fund**<br>**Saving Account No. 10972433751**<br>**State Bank of India**<br>**Mumbai Main Branch,**<br>**Fort, Mumbai-400 001.**<br>**Branch Code- 00300,**<br>**IFS Code : SBIN0000300** |

( **<u>टिप</u>**:- मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडून बँक खात्यात जमा होणा-या देणगी रकमांबाबत नोंद घेणे, इ. कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे सामान्य प्रशासन विभाग, कार्या.१६-अ कडे सदर धनादेश/धनाकर्ष, देणगीदारांची यादी, इ. माहिती पाठविण्याची आवश्यकता नाही.)

(पाच) शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन वाटप करतांना त्यांच्याकडून वसूल करावयाच्या वेतनाइतक्या रकमेचे प्रमाणपत्र तयार ठेवण्यात यावे. सदर प्रमाणपत्र विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख अथवा संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांच्या स्वाक्षरीने संबंधितांना देण्यात यावे. त्यामुळे मुख्यमंत्री सहायता निधीतून परत वेगळया व्यक्तिगत पावतीची व प्रमाणपत्राची आवश्यकता राहणार नाही. वेतन वाटप करीत असतानाच या परिपत्रकासोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र त्यांना देण्यात यावे.

(सहा) बृहन्मुंबईतील मंत्रालयीन विभाग व अन्य विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख इत्यादींनी गोळा केलेला निधीचा धनादेश, देणगीदारांच्या यादीसह (दोन प्रती) परस्पर मुख्यमंत्री सचिवालयातील मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष यांच्याकडे समक्ष पाठवून त्याबद्दलची पोचपावती घ्यावी.

(सात) जिल्हास्तरावर जनतेकडून व विविध संस्थांकडून जमा होणारी रक्कम विभाग/ कार्यालय प्रमुखांनी संबंधित देणगीदारांच्या यादीसह (दोन प्रती) त्या त्या जिल्हाधिका-यांकडे सुपूर्द करावी. जिल्हाधिकारी यांनी त्यांच्याकडे धनादेशाव्दारे जमा झालेली रक्कम उपरोक्त सूचना क्रमांक (चार) मध्ये नमूद बँक खात्यात जमा करुन त्या संबंधातील पोचपावती व तपशिलासह मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे उपरोक्त पत्त्यावर पाठवावी.

रोखीने प्राप्त झालेल्या रकमेच्या बाबतीत जिल्हाधिका-यांनी कार्यालयनिहाय यादी तयार करुन एकूण रकमेचा स्टेट बँक ऑफ इंडियाचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये उपरोक्त अ.क्र. (चार) मध्ये नमूद कार्यपध्दतीप्रमाणेच जमा करुन त्याबाबत परिशिष्ट **'अ'** प्रमाणे प्रमाणपत्र संबंधितांना दयावे व अशा प्रकारे प्राप्त निधीच्या तपशीलासह माहिती नमुना **'ब'** व **'क'** मध्ये मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे पाठवावी. अशा रकमेचा भरणा दर आठवडयाला अथवा ठराविक काळामध्ये करावा, तोपर्यंत ही रक्कम सोयीकरिता जिल्हास्तरावरील जिल्हाधिकारी यांच्याकडील मुख्यमंत्री निधीच्या स्टेट बँकेकडील बचत खात्यात सुरक्षित ठेवायला हरकत नाही. मात्र त्याचा हिशोब वेगळा ठेवावा.

(आठ) एक दिवसाच्या एकूण वेतनाइतक्या रकमेपेक्षा कमी रक्कम कापून घेण्यास परवानगी देण्यात येऊ नये.

५. मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष यांनी उपरोक्त परि.४ (सहा) व (सात) मध्ये उल्लेख केलेल्या देणग्या स्वीकारुन/प्राप्त झाल्याची खातरजमा करुन संबंधितांना एकत्रित पोचपावती तात्काळ देण्याची व्यवस्था करावी.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१७०६२११६२४३९३६०७ आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bajirao Ramchandra Jadhav

Digitally signed by Bajirao Ramchandra Jadhav
DN: c=IN, o=All India Services, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=da7af9a688a9961efe4eae0cdd0d1faf68b32eafe7e333344d14d91248f753bf, cn=Bajirao Ramchandra Jadhav
Date: 2017.06.21 16:22:18 +05'30'

**( बाजीराव जाधव )**

सचिव (सा.वि.स.), सामान्य प्रशासन विभाग

महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०००३२.
२) सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३) मा. राज्यपालांचे सचिव, मलबार हिल, राजभवन, मुंबई-४०० ०३५.
४) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) सर्व मा. मंत्री /मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६) मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद), विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा), विधानभवन, मुंबई-४०० ०३२.

१०) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई- ४०० ०३२.
११) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.
१२) उप सचिव (आस्थापना) ,सर्व मंत्रालयीन विभाग
१३) सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी.
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय ( मूळ न्याय शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१६) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१७) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१९) सरकारी वकील, उच्च न्यायालय, मूळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
२०) सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
२१) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई.
२२) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर.
२३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती)

**त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन परिपत्रकास प्रसिध्दी देण्याबात आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.**

२४) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
२५) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका.
२६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२७) ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२८) राज्यातील सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक.
२९) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य.
३०) निवड नस्ती, कार्या.१६-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

*************

**अनुमतीपत्र**

मी, श्री./श्रीमती/कुमारी..........................................................आपल्या विभागात/ कार्यालयात ......................... पदावर कार्यरत आहे.

राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या विधवा पत्नी पत्नी व मुलांना मदत म्हणून माहे जुलै, २०१७ च्या माझ्या वेतनातून १ दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देण्यास मी इच्छुक आहे.

विभागातील/कार्यालयातील रोख कार्यासन व रोखपाल यांनी माझ्या देय वेतनातून माहे जुलै, २०१७ च्या वेतनातून १ दिवसाचे वेतन कपात करून घेण्यास माझी सहमती आहे.

आपला / आपली,

स्थळ:-

दिनांक:- ( )

अधिकारी/कर्मचारी यांचे नाव व पदनाम

आयकर प्रमाणपत्राचा नमुना खालील प्रमाणे :-.

**परिशिष्ट-अ**

**प्रमाणपत्राचा नमुना**

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/कुमारी.............................. जे/जी.................................. विभागात/कार्यालयात ..........................पदावर कार्यरत आहेत, त्यांनी "मुख्यमंत्री सहायता निधीसाठी "₹ ....................../- (अक्षरी रुपये.........................................) एवढी देणगी दिली असून ही देणगी आयकर अधिनियम, १९६१ कलम ८० (ग) (२) (तीन एच एफ) खाली १०० टक्के सुटीस पात्र आहे.

स्थळ: - विभागप्रमुख /कार्यालय प्रमुख /आहरण व संवितरण अधिकारी

दिनांक:- यांची सही व शिक्का

**परिशिष्ट-ब**

मुख्यमंत्री सहायता निधी खात्यात जमा करण्यात येणा-या रकमांचा तपशील

प्रमाणपत्राचा नमुना

कार्यालयाचे नाव व पत्ता :-

| अ.क्र. | आहरण व संवितरण अधिका-याचे नाव, पदनाम व संपूर्ण पत्ता | धनादेश/धनाकर्षाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बँकेचे नाव व शाखा | क्रमांक | दिनांक | रक्कम (रुपये) |
| | | | | | |
| | | | | | |

सक्षम प्राधिका-याची सही व शिक्का

**परिशिष्ट-क**

मुख्यमंत्री सहायता निधी खात्यात जमा करण्यात येणा-या रकमांचा तपशील

प्रमाणपत्राचा नमुना

जिल्हाधिकारी कार्यालय:-

| अ.क्र. | देणगीदाराचे पूर्ण नाव व संपूर्ण पत्ता | धनादेश/धनाकर्षाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बँकेचे नाव व शाखा | क्रमांक | दिनांक | रक्कम (₹) |
| | | | | | |
| | | | | | |

सक्षम प्राधिका-याची सही व शिक्का

------XXXXXXX-----